# प्रभाकर पणशीकरांच्या 'आठवणींचे मोती'चे शुक्रवारी प्रकाशन

▶ मुंबई *(प्रतिनिधी)*

नटसम्राट प्रभाकर पणशीकर यांनी लिहिलेल्या 'आठवणीतील मोती' या पुस्तकाचे प्रकाशन त्यांच्या पहिल्या स्मृतिदिनी शुक्रवार, १३ जानेवारी रोजी होणार आहे. माटुंगा येथील यशवंत नाट्यमंदिरात सायंकाळी ८ वाजता जयंत साळगावकर यांच्या हस्ते पुस्तक प्रकाशित होईल. दोन वर्षापूर्वी पणशीकरांनी आपल्या आयुष्यातील कडू-गोड अनुभव आठवणींच्या रूपाने 'चाफा डॉट कॉम'वर लिहिले होते. नाटकामागचे नाटक, प्रयोग करतानाच्या अडचणी, रसिकांचे प्रेम अशा विविध आठवणींचा खजिना या पुस्तकात आहे. राजेंद्र प्रकाशनने या पुस्तकाची निर्मिती केली असून, 'बुकगंगा डॉट कॉम'ने या आधीच ते ई-बुक स्वरूपात उपलब्ध केले आहे.